अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



## निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केला निवडणूक रोख्यांचा तपशील

**नवी दिल्ली** : सुप्रीम कोर्टाने फटकारल्यानंतर मंगळवारी सायंकाळी भारतीय स्टेट बँकने निवडणूक रोख्यांचा तपशील निवडणूक आयोगाकडे दिला होता. कोर्टाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाला हा तपशील उद्या १५ मार्चपर्यंत आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध करणे अनिवार्य होते. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने आज सायंकाळीच निवडणूक रोख्यांबाबतचा तपशील आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला आहे. तपशीलातून कोणत्या कंपनीने निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, याबाबतची माहिती समोर आली आहे. निवडणूक आयोगाने आपल्या वेबसाइटरवर प्रसिद्ध केलेल्या तपशीलामध्ये १२ एप्रिल २०१९ नंतरच्या १ हजार रुपयांपासून १ कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांच्या खरेदीची माहिती आहे.

## १७ वर्षीय मुलीची आत्महत्या

**अक्कलकोट** : भुरीकवठे ता. अक्कलकोट येथील १७ वर्षीय मुलीने अज्ञात कारणावरून गुरूवारी दुपारी तीन वाजण्यापुर्वी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. भाग्यश्री मल्लीनाथ वळदड्डे (वय-१७ वर्षे) रा. भुरीकवठे, ता. अक्कलकोट असे मयत मुलीचे नांव आहे. याबाबत उत्तर पोलीस स्टेशन मध्ये अकस्मात मयत दाखल झाले असुन याबाबत पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, मयत भाग्यश्री मल्लिनाथ वळदड्डे ही १४ मार्च रोजी दुपारी ३ वा. चे पुर्वी राहते घरातील लोखंडी एँगलला तिचे पांढरे रंगाचे ओढणीने गळफास घेतली असता वैद्यकीय उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे दाखल केले असता दुपारी ०४.१५ वा. चे सुमारास उपचारापुर्वीच ती मयत झाली. खबर नातेवाईक बसवराज हिरके, (वय-३३ वर्षे)यांनी दिले. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण हे करीत आहेत.

# जिल्हा परिषद प्रवेशद्वारालगतच्या २६ खोक्यांवर फिरवला जेसीबी

### ▶ महापालिका व पोलीस प्रशासनाची कारवाई; पोलिसांचा तगडा बंदोबस्त

सोलापूर/प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेच्या पुनम गेट समोर उजव्या व डाव्या बाजूच्या फुटपाथ वरील अनधिकृत सुमारे २६ खोक्यांवर जेसीबी फिरवण्यात आला. तगड्या पोलीस बंदोबस्तात सोलापूर महापालिका आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने ही मोठी कारवाई करण्यात आली. यावेळी अनधिकृत खोकेधारकांनी वेळ मागत कारवाई थांबविण्यासाठी प्रयत्न केला मात्र प्रशासनाने ते नाकारत कारवाई केली.**






सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आजू - बाजूला (पुनम गेट) विविध प्रकारची आंदोलने करण्यात येतात. या आंदोलनासाठी बाजूला जागा कमी पडत आहे. पोलीस प्रशासन आणि महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने ही कारवाईची मोहीम गुरुवारी सकाळपासूनच राबविण्यात आली. महापालिका अतिक्रमण विभागाच्या विभागाचा जेसीबी तसेच कर्मचाऱ्यांचा फौज फाटा पोलीस बंदोबस्तात कारवाई स्थळी दाखल झाला. यावेळी अनधिकृत खोकेधारकांची चांगलीच धांदल उडाली. आम्हाला बाजू मांडण्यासाठी वेळ द्यावा. सामान काढून घेतो. नुकसान करू नका अशी भूमिका मांडत कारवाई थांबवण्याची मागणी संबंधित खोकेधारकांनी केली. दरम्यान, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या पथकाने साधारणतः अर्धा तास वेळ दिला.

त्यानंतर पुन्हा पोलीस अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार कारवाई सुरू ठेवली. जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या व डाव्या बाजूकडील सुमारे २६ अनधिकृत खोके जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आली. त्यानंतर येथील खोक्यांचे पत्रे व इतर भंगार जप्त करण्यात आले. कारवाईदरम्यान काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पालिका व पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. गेल्या ४० वर्षापासून हे खोकेधारक तिथे व्यवसाय करीत आहेत. त्यांना अवधी द्यावा अशी सूचना केली. त्यानंतर या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस आयुक्त यांच्याशी चर्चा करतो असे नरोटे यांनी यावेळी सांगितले. त्यांनतर कारवाई अखंडितपणे सुरू ठेवण्यात आली. या कारवाई वेळी मोठी गर्दी झाली होती. गेल्या ४० वर्षापासून आम्ही येथील खोक्यांमध्ये व्यवसाय करीत आहोत. जिल्हा परिषद प्रशासनाकडून नव्या रचनेचा प्रस्ताव विचाराधिन आहे. तत्पूर्वीच ही कारवाई करण्यात आली. बाजू मांडण्यासाठी वेळ द्यायला हवा होता, अशी भावना अनधिकृत खोकेधारकांनी व्यक्त केली.

### पुन्हा आठ दिवसानंतर या ठिकाणी कारवाई

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या लगतच्या उजव्या व डाव्या बाजूकडील सुमारे २६ अनधिकृत खोकी जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आली. महापालिका व पोलीस प्रशासनाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची यंत्रणा उपलब्ध करण्यात आली. दरम्यान आठ दिवसानंतर पुन्हा या ठिकाणी उर्वरित कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

## पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी जखमी

### टीएमसीने शेअर केला रक्तबंबाळ अवस्थेतील फोटो



**पश्चिम बंगाल** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी गंभीर जखमी झाल्या आहेत. तृणमूल काँग्रेसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री संध्याकाळी घरी ट्रेडमिलवर चालत असताना कोसळल्या. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. दुखापतीनंतर, गुरुवारी संध्याकाळी तृणमूल काँग्रेसच्या सुप्रिमोला गंभीर अवस्थेत कोलकाता येथील सरकारी एसएसकेएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. ममता बॅनर्जी जखमी झाल्यामुळे त्यांचे भाच्चे अभिषेक बॅनर्जी त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना राज्य सरकारद्वारे संचलित ड्ड्यच् रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरु आहेत.

ममता बॅनर्जी यांना यापूर्वी अनेकदा अपघातांना आणि दुखापतींना सामोरे जावे लागले आहे. २०२१ मध्ये त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे त्यांच्यावर महिने उपचार सुरु होते. हा अपघात झाला तेव्हा पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका प्रचार सुरु होत्या.

### जानेवारी महिन्यातही झाल्या होत्या जखमी

चालू वर्षातील जानेवारी महिन्यातही ममता बॅनर्जी यांना अपघात झाला होता. वर्धमानकडून कोलकाताकडे परतत असताना हा त्या जखमी झाल्या होत्या. सूत्रांच्या माहितीनुसार पावसामुळे ममता बॅनर्जी परतत होत्या. यावेळी कारचा ब्रेक लावल्यानंतर डोक्याला दुखापत झाली होती. ममता यांच्या ताफ्यात आणखी काही कार आल्याने ड्रायव्हरला अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला दुखापत झाली होती.

# महापालिकेने मुरारजी पेठेतील एका कॉटेजसह ६ गाळे केले सील

### ▸ मिळकतकर वसुलीसाठी ६ नळ तोडले
### ▸ वसुली पथकांकडून ३१.०५ लाखांची वसूली

**सोलापूर** : मिळकत कर थकबाकी पोटी महापालिकेच्या वसुली पथकाकडून आज मुरारजी पेठ येथील समृद्धी कॉटेजसह ६ गाळे सील करण्यात आले. विविध मिळकतींवरील ६ नळ तोडण्यात आले. आज दिवसभरात ३१ लाख ५ हजार ६७४ रुपये विविध पथकांकडून कर वसूली करण्यात आली.




महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मिळकत कर संकलन अधिकारी युवराज गाडेकर यांच्या नियंत्रणाखाली विविध पथकाच्या माध्यमातून मिळकत कर थकबाकी वसुलीसाठी सील व नळ बंद कारवाई मोहीम गेल्या १३ दिवसापासून सुरू आहे. दरम्यान, आज चौदाव्या दिवशी सोलापूर शहरात विविध ठिकाणी वसुली पथकांनी कारवाई केली. ६ नळ तोडण्यात आले आहेत. तर मुरारजी पेठ येथील ६ गाळे व १ कॉटेज सिल करण्यात आले आहेत. आज पथक निहाय केलेली वसुलीची रक्कम आणि नळ बंद कारवाई याप्रमाणे - पथक क्रमांक १ - वसुली ६ लाख ८४ हजार ७०० रुपये - नळ बंद, पथक क्रमांक २ - वसुली २ लाख ६ हजार ४२४, पथक क्रमांक ३ - वसुली २ लाख ८८ हजार ४८० रूपये, पथक क्रमांक ४- वसुली - ३ लाख १ हजार ५६० रुपये , पथक क्रमांक -५ - वसुली १ लाख ४७ हजार ५३ रुपये, पथक क्रमांक-६ वसुली ९ लाख १७ हजार २१५, पथक क्रमांक (पान ७ वर)

## तलाठी आणि कोतवालास मारहाण

**सोलापूर** : वाळूची चोरटी वाहतूक रोखण्यासाठी आलेल्या तलाठी आणि कोतवालास डांबून ठेवून मारहाण करीत वाळू माफियांनी आणि ट्रॅक्टर आणि ट्रॉली घेऊन पोबारा केला.

ही घटना तरटगाव (ता. लुका) पंढरपूर येथील भीमा नदीच्या पात्रात बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करकंबच्या पोलिसांनी सागर मानकर (रा. खळवे ता.तालुका माळशिरस) आणि अन्य दोघाविरुद्ध शासकिय कामात अडथळा, चोरी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात रोहन तानाजी करकटे (वय ५९) या तलाठ्यांनी करकंब पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सागर मानकर आणि त्याच्या दोन साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला. तरटगाव येथील भीमा नदीच्या पात्रात काल सायंकाळी मानकर हा ट्रॅक्टर मध्ये वाळू चोरी करत होता. त्यावेळी (पान ७ वर)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पेट्रोल आख्खे दोन रुपये स्वस्त झालंय, अजून काय पाहिजे?

| कल्याण |
|---|
| 145-08-288 |

| मुंबई |
|---|
| 135-90-389 |




